**निशाणी क्र. २२**

(साक्षीदार हा १३ वर्ष वय असलेला अज्ञान मुलगा असल्याने त्याची साक्ष अभियोग पक्ष आणि आरोपींचे वकील यांच्या संमतीने बंद कक्षामध्ये घेण्यात येत आहे. आरोपीस बुलढाणा येथील जेलमधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या सहाय्याने हजर करण्यात आले असून त्यांना या प्रकरणातील सुनावणीचे दृश्य दिसत आहे आणि श्रवण होत आहे याची खात्री करून घेण्यात आली. साक्षीदार हा प्रश्नांची उत्तरे समर्पक देण्यास समर्थ आहे की कसे यासंदर्भात काही प्रश्नांची विचारणा करण्यात येत आहे.)

प्रश्न क्र. **१.** तुझे नाव काय आहे?

**उत्तर** समर्थ विष्णू खैरे.

प्रश्न क्र. **२.** तुझी जन्मतारीख तुला सांगता येईल का?

**उत्तर** मला माझी जन्मतारीख माहीत नाही. वय तेरा वर्ष आहे.

प्रश्न क्र. **३.** तुला किती बहिण भाऊ आहेत?

**उत्तर** मला दोन भाऊ आणि एक बहीण आहे.

प्रश्न क्र. **४.** तू कितव्या इयत्तेत शिकतो?

**उत्तर** मी सहाव्या इयत्तेत शिकतो.

प्रश्न क्र. **५.** कोणता विषय तुला आवडतो ?

**उत्तर** मराठी आवडतो.

प्रश्न क्र. **६.** तो विषय का आवडतो?

**उत्तर** तो सोपा आहे.

प्रश्न क्र. **७.** मराठी विषयांमध्ये काय आवडते?

**उत्तर** थोडा उशीर झाला हा धडा आवडतो.

(साक्षीदाराचे सामान्य ज्ञान चांगले असून प्रत्येक प्रश्नांची उत्तरे व्यावहारिक आणि प्रश्नांची समर्पक अशी देत असल्याने तो मानसिकरित्या साक्ष देण्यास सक्षम आहे या निष्कर्षापर्यंत पोहोचता येते त्यामुळे साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे)

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ (PW– 3) यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – समर्थ विष्णू खैरे.

वय – १३ वर्षे, व्यवसाय – शिक्षण

राहणार – शरद कॉलेज महाविद्यालय, चिखली रोड, बुलढाणा.

– – – – –

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी शासकीय अभियोक्ता श्री.वि.मा. बापट यांच्यामार्फत</u>**

प्रश्न क्र. **१.** कोर्टात आल्यावर कसे बोलावे लागते?

**उत्तर:–** कोर्टात आल्यावर पद्धतशीर बोलावे लागते.

प्रश्न क्र. **२.** तुझ्या घरी कोण कोण राहते?

**उत्तर:–** आता आजोबा राहतात.

प्रश्न क्र. **३.** घटनेच्या वेळी तुझ्या घरी कोण कोण राहत होते?

**उत्तर:–** मी, माझे दोन भाऊ, एक बहीण, आई वडील आणि आजोबा राहत होते.

प्रश्न क्र. **४.** तुझ्या वडिलांचे नाव काय होते?

**उत्तर:–** माझ्या वडिलांचे नाव विष्णू आत्माराम खैरे आहे.

प्रश्न क्र. **५.** तुझ्या आईचे नाव काय होते?

**उत्तर:–** वर्षा नाव होते.

प्रश्न क्र. **६.** तुझी आई आहे का?

**उत्तर:–** ती वारली.

प्रश्न क्र. **७.** कशाने वारली.

**उत्तर:–** पप्पाने तिला मारून टाकले.

प्रश्न क्र. **८.** काय झाले होते त्या दिवशी?

**उत्तर:–** माझे पप्पा दारू पिऊन आले होते. त्यांनी चिकन आणि आंबे आणले होते. ते घरात आले. ते मम्मीला मारायला लागले. बारा वाजता पप्पा आले होते. माझी बहीण फाशी बसता बसता वाचली. मी आणि आबा घरात गेलो. आम्ही पप्पांना म्हणलो मारू नका मारू नका. मी डोके फुटता पुढता वाचलो. आबाचा टोंगळा मधात होता म्हणून मी बाजूला पडलो. माझ्या आईला पप्पाने वायरने, जाळ फुंकणी, काड्या, टेम्पे यांनी मारले. माझे पप्पा म्हणत होते की चिकन बनव. माझ्या आईचे डोळे फुगले होते. काडयचे वन हातपाय आणि पाठीवर उमटले होते. माझे पप्पा बाहेर आले. ते दारू पीत होते. आम्हाला आंबे दिले होते खायला. माझ्या पप्पांनी दार लावून घेतले होते. माझ्या आईला पलंगाचे टोक लागले होते. तिला पप्पांनी त्यावर लोटले होते. घरामध्ये आईचे रक्त सांडले होते. आम्ही बोलवायला गेलो तर कोणीच भेटले नाही. पप्पा नेते रक्त पुसून घेतले होते. आईला त्यांनी चादर टाकून खाली झोपवले होते आणि तिच्या अंगावर पुन्हा चादर टाकली होती.पोलीस आले आणि मम्मीला गाडीत नेले. पप्पालाही घेऊन गेले.

प्रश्न क्र. **९.** तुझी आई कोणते कपडे घालत असे?

**उत्तर:–** साडी, परकर आणि ब्लाऊज घालत असे.

प्रश्न क्र. **१०.** तुला ते कपडे दाखविले तर ओळखता येईल का?

**उत्तर:–** होय.

प्रश्न क्र. **११.** त्या दिवशी तुझ्या बाबांनी घातलेले कपडे ओळखशील का?

**उत्तर:–** होय.

प्रश्न क्र. **१२.** पलंगाचा टोक जो तुझ्या आईला लागला होता तो तुला दाखविल्यास ओळखू शकतो का?

**उत्तर:–** होय.

प्रश्न क्र. **१३.** घटनेच्या दिवशी तुझ्या बाबांनी ज्या काढणी मारले होते त्या काड्या ओळखशील का?

**उत्तर:–** होय.

प्रश्न क्र. **१४.** तो त्यावेळी आणखीन काय केले होते?

**उत्तर:–** नाही सांगता येणार.

(साक्षीदारासमोर मुद्देमाल पुन्हा उघडण्यात आला. साक्षीदाराने पलंगाचा लोखंडी ठावा – मटेरियल ऑब्जेक्ट १, लाकडी दांडा–मटेरियल ऑब्जेक्ट २, साडी – मटेरियल ऑब्जेक्ट ३, पेटिकोट – मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ४, ब्लाउज – मटेरियल ऑब्जेक्ट ५, शर्ट – मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ६, चौकडीचा शर्ट – मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ७, राखाडी रंगाच्या जीन्स पॅन्ट – मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ८, दुसरी जीन्स पॅन्ट – मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ९, टी–शर्ट – मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक १० , एकूण ८ आठ काड्या – एकत्रीतपणे मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ११ ओळखल्या तुमचा ऑब्जेक्शन तेच ठेवायचं का.)

(आरोपीतर्फे हरकत घेण्यात आली की सदर मुद्देमाल हा या साक्षीदाराकडून अथवा त्याच्या समक्ष जप्त केला नसल्याने तो पुराव्यात सामील करून घेता येणार नाही. परंतु हा साक्षीदार प्रत्यक्षदर्शी असल्याने त्यास सदर मुद्देमाल दाखविणे आवश्यक असल्याने तो मुद्देमाल त्याच दाखविण्यात आला.)

प्रश्न क्र. **१५.** ती घटना घडली तेव्हा तू कितवी मध्ये शिकत होता?

**उत्तरः–** तिसरी मध्ये.

प्रश्न क्र. **१६.** आता कितवी मध्ये आहेस?

**उत्तरः–** सहावी मध्ये आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत</u>**

प्रश्न क्र. **१७.** तुझे योगेश मामा कुठे असतात?

उत्तरः– सुपो पळशी येथे असतात.

प्रश्न क्र. **१८.** आत्तापर्यंत बुलढाण्याहून तू मामाकडे किती वेळा गेलास?

उत्तरः– एकदा गेलो होतो. दिवाळीच्या वेळेस गेलो होतो.

प्रश्न क्र. **१९.** त्यावेळी मामाकडे कोण कोण गेला होता?

उत्तरः– मी आणि माझे दोन भाऊ गेलो होतो.

प्रश्न क्र. **२०.** मामाकडे किती दिवस राहिले?

उत्तरः– नऊ दिवस राहिलो.

प्रश्न क्र. **२१.** त्यावेळी मामा आणि त्याच्या घरच्यांनी घटना कशी घडली ते तुला सांगितले ते खरे आहे का?

उत्तर:– नाही सांगितले.

प्रश्न क्र. **२२.** बुलढाण्याहून आज येताना तुझ्यासोबत कोण होते?

उत्तर:– माझा भाऊ आणि काकाजी अजय सोनुने आहेत. ते आमचे केअरटेकर आहेत.

प्रश्न क्र. **२३.** कोर्टात येऊन तुम्ही पोलीस काकाकडे गेलात हे खरे आहे का?

उत्तर:– होय.

प्रश्न क्र. **२४.** त्यांनी तुम्हाला कोर्टात काय काय सांगणे आहे ते समजून सांगितले?

उत्तर:– हो.

प्रश्न क्र. **२५.** त्यांनी सांगितल्याप्रमाणे तू हे कोर्टात सांगत आहे?

उत्तर:– होय.

प्रश्न क्र. **२६.** तुलाही तसे सांगितले आणि तुझ्या भावालाही तसे सांगितले हे बरोबर आहे का?

उत्तर:– होय.

प्रश्न क्र. **२७.** तुम्हाला जे त्यांनी बाहेर सांगितले त्याप्रमाणे तू साक्ष दिली हे बरोबर आहे का?

उत्तर:– होय.

प्रश्न क्र. **२८.** काय घटना घडली ते तुला माहिती नव्हते?

उत्तर:– माहिती होते.

प्रश्न क्र. **२९.** तुझी घटना सर तपासात सांगितली ती तू खोटी सांगितली?

उत्तर:– नाही.

प्रश्न क्र. **३०.** तू पोलिसांच्या सांगण्यावरून आज खोटी साक्ष दिली?
उत्तरः– नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास – काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 17:37:00 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०३/२०२५.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत दुपारी १४.४८ वाजता सुरु करुन १५:२० वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 17:37:04 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०३/२०२५.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |